एक दिवसीय राष्ट्रीय परिषद

(स्वयं अर्थसहाय्यित)

# जागतिकीकरणाचे मराठी भाषा आणि साहित्यापुढील आव्हाने व उपाय

आयोजक

## मराठी विभाग

श्री गजानन शिक्षण प्रसारक मंडळ, येलदरी (कॅम्प) द्वारा संचलीत

(भाषिक अल्पसंख्यांक (मारवाडी) दर्जा प्राप्त)

## तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

सेनगांव जि. हिंगोली (महाराष्ट्र) – ४३१५४२



| संयोजक | समन्वयक | |
|---|---|---|
| प्रा. डॉ. अंजली. द. टापरे | प्रा.उत्तम. पुं. सुपारे | प्रा.श्रीपाद. ग. तळणीकर |
| मराठी विभाग | मराठी विभाग प्रमुख | प्र. प्राचार्य |

Scanned with OKEN Scanner

| अ.क्र. | शिर्षक | लेखकाचे नांव | पान क्र. |
|---|---|---|---|
| 39 | जागतिकीकरण आणि आंबेडकरी कविता | पंजाब पुंजाजी टापरे | 139 |
| 40 | जागतिकीकरण आणि मराठी ग्रामीण साहित्य | प्रा.डॉ.मारोती भोसले, | 142 |
| 41 | जागतिकीकरण -- भाषा आणि संस्कृती एक चिंतन. | प्रा.राजू संभा धुळे | 145 |
| 42 | जगतिकीकरणाचा मराठी ग्रामीण साहित्यावर झालेला परीणाम | प्रा. डॉ. पंडीत शिंदे . | 147 |
| 43 | जागतिकीकरण आणि स्त्रीवादी साहित्य | प्रा. संध्या जंजाळ | 149 |
| 44 | जागतिकीकरणात मराठी भाषेचे बदलते स्वरूप | प्रा.शेजवळ जितेंद्र बाबुराव | 152 |
| 45 | आसाराम लोमटे यांच्या साहित्यावरील जागतिकीकरणाचा प्रभाव | संजय नामदेवराव आटवले | 155 |
| 46 | जागतिकीकरण आणि मराठी भाषा | प्रा.डॉ. दिलीप सावंत | 160 |
| 47 | जागतिकीकरण आणि मराठी साहित्य | सुरेश देवचंद शिरसाट | 163 |
| 47 | मराठवाड्यातील शेतकरी : जागतिकीकरण आणि मराठी ग्रामीण कविता | डॉ. मारोती माधवराव घुगे | 165 |
| 48 | जागतिकीकरण आणि कविता | प्रा. डॉ. किरण वाघमारे | 169 |
| 49 | ग्रामीण कादंबरी विष्यातील जागतिकीकरण | प्रा.डॉ. रामदिनेवार गोविंद | 175 |
| 50 | जागतिकीकरण : मराठी भाषा आणि साहित्य | डॉ. भास्कर श्रावण गायकवाड | 179 |
| 51 | जगतिकीकरण आणि मराठी साहित्य | प्रा.डॉ. नवीन के. गिलबिले | 182 |
| 52 | जगतिकीकरणाचा मराठी साहित्यावरील प्रभाव | रा.ज. चाटे | 185 |
| 53 | जागतिकीकरण आणि मराठी ग्रामीण् कादंबरी | प्रा.प्रमोद भ. इंगोले | 189 |
| 54 | जागतिकीकरण, शेतकऱ्यांचे प्रश्न वशेतकरी संघटना | प्रा. डॉ. ज्ञानदेव राऊत | 192 |
| 55 | जागतिकीकरण आणि कविता | मारोती रामराव कोल्हे | 195 |
| 56 | जागतिकीकरण आणि दलित साहित्य | डॉ.रविंद्र आ.गायके | 197 |
| 57 | भारतीय संविधान आणि भाषा | प्रा. वाघमारे के.एच | 200 |
| 57 | जागतिकीकरण आणि दलित साहित्य | डॉ. शत्रुघ्न जी. जाधव | 203 |
| 58 | जगतिकीकरण आणि आदिवासी समाज | प्रा. सुनिता बोंबे पाटील | 207 |
| 59 | जागतिकीकरणाचा मराठी ग्रामीण कवितेवर प्रभाव | पंजाब लक्ष्मण शेरे | 209 |
| 60 | जागतिकीकरण आणि कविता | प्रा.डॉ. श्रीराम कऱ्हाळे | 211 |
| 61 | जागतिकीकरण आणि ग्रामिण साहित्याचे बदलते संदर्भ | प्रा. पंडित किशनराव मोरे | 213 |
| 62 | जागतिकीकरणातील माझी कविता : एक आकलन | डॉ. लहू दिगंबर वाघमारे | 216 |
| 63 | जागतिकीकरणाचा महानगरीय मराठी कवितेवरील प्रभाव | डॉ. संगिता ग. घुगे | 220 |
| 64 | जागतिकीकरण आणि मराठी भाषा | कु. हागे शिल्पा नारायण | 223 |
| 65 | जागतिकीकरण आणि दलित साहित्य | शरद वसंता नरवाडे | 226 |
| 66 | मराठी भाषा सद्यस्थिती आव्हाने व उपाय | कु. वैद्य किरण रामराव | 228 |
| 67 | जागतिकीकरण आणि कादंबरी | अनिल किसन राउत | 231 |
| 68 | जागतिकीकरण आणि ग्रामीण कादंबरीतील समाज जीवन | कु.स्वाती मुकूंदराव वाईकर | 233 |
| 69 | जागतिकीकरण आणि आदिवासी साहित्य | वाकळे प्रभावती दत्तराव | 236 |
| 70 | जागतिकीकरणाचा मराठी भाषा व साहित्यावरील प्रभाव | प्रा. सुपारे यु.पी. | 240 |
| 71 | जागतिकीकरण मराठी भाषा आणि साहित्य | डॉ. अंजली द. टापरे | 243 |
| 72 | जागतिकीकरण आणि आंबेडकरी कविता | डॉ. राजीवर पैठणकर | 245 |
| 73 | जागतिकीकरण व मराठी भाषा | प्रा. शिंदे एच.टी. | २४७ |
| 74 | जागतिकीकरण आणि मराठी भाषा | फड संजय बाबुराव | 249 |
| 75 | जागतिकीकरणाचा लोकसाहित्यावरील प्रभाव व परीणाम | शेळके रंगनाथ माणिकराव | 253 |
| 76 | जागतिकीकरण आणि कादंबरी | विलास चुडामण बोथीकर | 255 |
| 77 | जागतिकीकरणातील माझी कविता : एक आकलन | डॉ. लहू दिगंबर वाघमारे | 258 |




Scanned with OKEN Scanner

# जागतिकीकरण व मराठी भाषा

**प्रा. शिंदे एच.टी.**
शा.शि.संचालक,
तोष्णीवाल महा.सेनगांव

**प्रास्ताविक :–**

आपल्या देशात जागतिकीकरणाची प्रकिया सूरू होउन आज दिडशे वर्षापेक्षा जास्त काळ लोटला आहे. या जागतिकीकरणाचे आपल्याला नेमके फायदे आहेत की तोटे हा संशोधनाचा विषय आहे. आज आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक बदलामुळे आपल्याला अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. वास्तविक पाहता जागतिकीकरणामुळे समाजात प्रगती होते हे नाकारता येत नाही पण अनेक समस्या व आव्हाने आपल्यापूढे निर्माण होतात. जागतिकीकरणामुळे जग जवळ आले पण माणसे मानसापासुन दुर गेले. समाजात विघटन निर्माण झाले. एक समाज गरिब तर दुसरा समाज श्रीमंत अशी दरी आपल्याला समाजात पाहावयास मिळते. जागतिकीकरणाचा परिणाम बँका,शेती, अन्नधान्य, शेतकरी, शेतमजुर, स्त्रीयांच्य समस्या, दलितांचे प्रश्न तसेच भाषाचे प्रश्न यावर परिणाम झालेला दिसुन येतो.

**<u>जागतिकीकरणाचा मराठी भाषेवरील परिणाम :</u>**

भारतात ज्या अनेक भाषा बोलल्या जाता. त्यात मराठी भाषा सुध्दा बोलली जाते. मराठी भाषा प्रामुख्याने महाराष्ट्रात बोलल्या जाते. विशेषतः पुणे, मुंबई या ठिकाणी प्रमाण मराठी भाषा बोलली जाते. पुणे हे प्रमाण मराठी भाषेचे माहेर घर आहे. पाठयपुस्तक निर्मितीचे काम पुणे येथेचे केले जाते. भाषा हे विचार विनिमयाचे साधन म्हणून वापरल्या जाते. पिढयानपिढया पासुन भाषेच्या माध्यमातुन सर्व व्यवहसार चालले आहेत. दर बारा कोसादर भाषा बदलते. त्यामूळे तेथील लोकांची संस्कष्ती राहणीमान,खानपान,त्यांची उच्चार पध्दती यांचे दर्शन त्यांया बोलीभाषेतुन घडते. उदा. व्ऱ्हाडात व्ऱ्हाडी भाषा बोलल्या जाते. खानदेशात अहेराणी बोली बोलल्या जाते. यावरून आपल्याला त्यांच्या गावाची शहरांची प्रांताची ओळख आपोआपच होते.

जगात अंदाजे 7000 भाषा बोलल्या जातात. जागतिकीकरणामुळे अनेक भाषा बोली संपुष्ठात आल्या आहेत. भारतात 180 भाषा व 544 बोली आहेत. युरोपीयन व्यापारी लोकांनी ज्या ज्या देशामध्ये वसाहती निर्माण केल्या त्या त्या देशातील भाषेवर आणि संस्कष्तीवर त्याचे परिणाम झालेले दिसुन येतात. स्थानिक जनसमूहाच्या मनावर आणि त्यांच्या जीवन जगण्याच्या पध्दतीवर फार मोठे परिणाम झालेले दिसून येतात. बहुराष्ट्रीय कंपन्या, आंतरराष्ट्रीय वित्त संस्था प्रसार माध्यमांमध्ये आधुनिक माहिती तंत्रज्ञान या सर्व घटकामधुन नवनवीन भांडवलशाही प्रणित एक भाषा एक अर्थव्यवस्था ही संकल्पना अस्तीत्वात येत आहे.

या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भाग आदिवासी, भटका समाज यांच्या बोली भाषेवर परिणाम झाला आहे. त्यांच्या बोली भाषा लोप पावत चाचल्या आहेत. अशा बोली भाषेची हानी म्हणजे त्यांच्या मानवतेची, समाजाची, संस्कृतीची हानी होय. म्हणुन प्रादेशिक भाषांना ज्ञान भाषा बनविणे काळाची गरज आहे. प्रादेशिक भाषेतुन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरी, रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्यास भाषेचे जतन होईल.

मराठी भाषेतील बोलीचा विचार केल्यास जार्ज ग्रिअर्सन यांच्या लिंग्वीस्टिक सर्व्हे ऑफ इंडीयाच्या खंड 7 व 9 मध्ये मराठीच्या सूमारे 40 बोलीचे नमुने दिले आहेत. व्ऱ्हाडी, हळवी, पोटारी, नागपुरी, अहिराणी, कोकणी, वारली, ठाकरी, डांगी, सामवेदी, कोल्हापुरी, नगरी, सोलापूरी, पुणेरी, चित्पावती असे अनेक प्रकार दिसतात. ग्रामीण भागातील अनेक शब्द आज लोप पावत चालले आहेत. उदा. जाते दळण दळण्याचे साधन, मोट– विहीरीतुन पाणी काढण्याचे साधन, उखळ, मुसळ, मुस्के अशी कितीतरी शब्द आज इतिहास जमा होत चालले आहेत. आज सर्व समाज जागतिकीकरणाकडे वळला आहे. जुन्या गोष्टी सोडून नवनवीन गोष्टीचा स्वीकार करीत आहे. अमेरिकेकडे प्रगत राष्ट्रात अनेक भाषा संपुष्टात येत आहेत. या जागतिकीकरणाच्या लाटेत बहुभाषा आणि त्यांची भाषा टिकवून ठेवणे काळाची गरज बनली आहे. उदयाची पिढी टिकवायची असेल तर जागतिकीकरणाला विरोध करून भाषा टिकविणे काळाचीगरज आहे.



Scanned with OKEN Scanner

**समारोप :**

1. जगतिकीकरणामुळे सर्व भाषा व त्यांच्या बोलीभाषेवर, समाज, समाजातील घटकांवर परिणाम झालेले दिसुन येतात.
2. जगतिकीकरणामुळे आदिवासी,भटके, यांची मुळ बोलीभाषा त्यांची संस्कष्ती,समाजव्यवस्था संपुष्टात येत आहे.
3. जगतिकीकरणामुळे खेडयापाडयातील बोलीभाषेतील जुने शब्द संपुष्टात येते आहे. त्याचा अर्थ पुढील पिढला कळत नाही. कारण त्या गोष्टी संपल्या आहे. उदा. 'जाते'– दळण दळण्याचे साधन, 'उखळ,मुसळ'– कांडण करण्याचे साधन, 'मोट'–विहीरीतुन पाणी काढण्याचे साधन असे शेती व्यवसायातील अनेक शब्द आज संपण्याच्या मार्गावर आहेत.
4. ग्रामीण संस्कष्ती तेथील सण,उत्सव, व्रत वैकल्य, धार्मिक विधी, यात्रा इत्यादी गोष्टी व त्यातुन एकमेकांना मिळणारा निखळ आनंद ,भावना, शब्दातील संवाद आज लोप पावत चालला आहे.

**संदर्भ :**


1. भालचंद्र नेमाडे – साहित्य, संस्कष्ती आणि जगतिकीकरण लोकवाङःमय गृह, मुंबई, 2003
2. प्रा. कराडे ज़गन – जागतिकीकरण भारतापुढील आव्हाणे, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, 2008
3. अरूण शिंदे – नव अनुष्टभ 2011 आधुनिकीकरण व जागतिकीकरणाचा बोली भाषेवरील परिणाम
4. भालचंद्र नेमाडे – उनि
5. ना.गो. कालेलकर – भाषा आणि संस्कष्ती, मौन प्रकाशन, मुंबई
6. रा.गो.चवरे (संपा) मराठी जनसाहित्य (जागतिकीकरण आणि जनसाहित्य)
7. डॉ. अविनाश आवलगांवकर – मराठीचे भवितव्य
8. डॉ. ग.ना.जोगळेकर – मराठीचा भार्षिक अभ्यास





Scanned with OKEN Scanner